1999 च्या निवडणुकीत भाजप त्यांच्या 24 मित्र पक्षांनी एकत्र येऊन राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन केली. त्या निवडणुकीत भाजपने सर्वाधिक 182 जागा मिळवल्या परंतु स्पष्ट बहुमत मिळाले नाही तर कॉंग्रेस व त्यांच्या मित्रपक्ष आघाडीला 114 जागा मिळाल्या. भाजपने अटल बिहारी वाजपेयींच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा सरकार स्थापन केले यावेळी पहिल्यांदाच अटल बिहारी वाजपेयी यांनी पाच वर्ष कार्यकाळ पूर्ण केला.

2004 च्या निवडणुका :-

2004 ची निवडणूक भाजपने इंडिया स्थानिक व नागरिकी या दोन मुद्द्यावर सोनिया गांधी या विरुद्ध विदेशी आहेत. भारतीय नाहीत हा मुद्दा उचलून धरला. तरीपण या निवडणुकीत भाजपचा पराभव होऊन सर्वाधिक 145 जागा मिळवल्या. भाजपला 138 जागा मिळाल्या डाव्या पक्षांनी कॉंग्रेसला पाठिंबा दिल्या कॉंग्रेसचे मनमोहन सिंग हे पंतप्रधान झाले. त्यांनी पाच वर्षाचे कामकाज पूर्ण केला. या निवडणुकीत पहिल्यांदाच भाजप व भाजपच्या मित्रपक्षाच्या या निवडणुकीला पहिल्यांदाच भाजप व भाजपच्या मित्रपक्षाचा या निवडणुकीत पराभव झाला यामुळे कॉंग्रेस मित्र पक्षाने चांगले निवडणुकीत पराभव झाला यामुळे कॉंग्रेस मित्र पक्षाने चांगले यश मिळाले. महायुद्ध 1999 च्या वेळी विदेशी येऊन शरद पवार यांनी राष्ट्रवादी पक्ष स्थापन केला. महाराष्ट्रात स्थापन राष्ट्रवादी

काँग्रेसला मानावा तितका फायदा झाला नाही. उलट काँग्रेस पक्षाकडून धर्म निरपेक्षतेच्या नावाखाली पाठिंबा मिळाला

२००९ ची निवडणूका :-

२००९ च्या निवडणूकीत सर्वाधिक २०६ जागा काँग्रेस पक्षाला मिळाल्या. भाजपचा पराभव झाला त्यांना ११६ जागा मिळाल्या. काँग्रेसने संयुक्त पुरोगामी आघाडी करून सरकार स्थापन केले. मनमोहन सिंग हे सलग दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले.

२०१४ ची लोकसभा निवडणूक :-

२०१४ च्या लोकसभा निवडणूकीत भारतीय जनता पक्षाने सर्वाधिक २८२ जागा मिळविल्या. काँग्रेसला फक्त ४४ जागा मिळाल्या नरेंद्र मोदी हे पहिल्यांदा पंतप्रधान झाले. या निवडणूकीत 'अच्छे दिन आने वाले है' यावर भर देण्यात आला.

२०१९ ची लोकसभा निवडणूक :-

२०१९ च्या लोकसभेच्या निवडणूकीत भारतीय जनता पक्षाचे सर्वाधिक राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ३५२ जागा मिळाल्या. काँग्रेसप्रणीत आघाडीला ९२ जागा मिळाल्या नरेंद्र मोदी हे दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले. या निवडणूकीत 'सबका साथ सबका विकास' यावर भर देण्यात आला.

सारांश :-

१९८९ नंतर झालेल्या लोकसभा निवडणूकामध्ये राष्ट्रीय पक्षांची भूमिका महत्त्वाची आहे. १९८९ नंतर भारतीय राजकारणात आघाडीचा कालखंड सुरु झाला. कारण कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत नव्हते. त्याचे कारण म्हणजे प्रादेशिक पक्षांचा झालेला उदय होय. २०१४ नंतर आघाडी सरकारमधील प्रादेशिक पक्षाचे महत्त्व कमी होत आहे कारण १९९० नंतर पहिल्यांदाच प्रादेशिक पक्षांचा प्रभाव कमी होत आहे. तर राष्ट्रीय पक्षांच्या जागांमध्ये वाढ होत आहे. उदा. २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत भारतीय जनता पक्षाने २८२ जागा तर २०१९ च्या निवडणूकीत ३०३ जागा मिळाल्या. एकूणच भारतीय राजकारणात एक पक्ष पद्धत बदलून आघाडी सरकारकडून पुन्हा एक पक्षीय पद्धतीकडे वाटचाल सुरु आहे.

OPPO A17 · ©Saurabh Pawar
2023/03/21 08:22

Page No.
Date

## प्रकरण ३ :- सामाजिक पैलू

प्रश्न १] जात आणि भारतीय राजकारण यातील संबंध स्पष्ट करा.

अ] प्रास्ताविक :-

भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौद्ध, अशा अनेक जाती धर्माचे लोक राहतात. या बहुतेक धर्मात जातिव्यवस्था अस्तित्वात आहे. भारतीय राजकारणात या जातीची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिलेली दिसते.

ब] भारतीय राजकारण व जातसंबंध :-

1] भारतातील जातिव्यवस्था :-

भारतात विविध धर्मामध्ये असंख्य जाती, पोटजाती आहेत हिंदू धर्मात प्रामुख्याने प्रमुख जाती दिसतात. राजकीय पक्षांची जातीशी जवळीकता आहे. त्यामुळे भारतीय राजकारण आकाराला येत आहे.

२] जातीचे राजकीयीकरण :-

जात ही अत्यंत बळकट संघटना आहे. लोकशाहीत बहुतांश राजकीय नेत्यांकडून राजकारणात जातीचा वापर केला जात आहे. विशिष्ट जाती ज्या बहुसंख्याक आहेत त्यांचा राजकारणात प्रभाव किंवा वर्चस्व दिसते.

३] प्रभुत्वशाली जातीचा सिद्धांत :-

एम. एन. श्रीनिवास यांनी प्रभुत्वशाली जातीचा सिद्धांत मांडला त्यांच्यामते भारताच्या प्रत्येक भौगोलिक भागात वेगवेगळ्या जातीचे वर्चस्व आहे. ते जातीची लोकसंख्या व जमीन या घटकावर आधारले आहे. उदा.. महाराष्ट्रात मराठा जातीचे वर्चस्व आहे. गुजरातमध्ये पाटीदार समाजाचे व उत्तर भारतात जाट समाजाचे वर्चस्व आहे.

क] भारतीय राजकारणातील जातीची भूमिका :-

भारतात आजच्या घडीला जातीचा आधार घेतल्याशिवाय राजकारण करता येत नाही म्हणजे मतदानाच्या वर्तनावर जात प्रभाव टाकते पेशवाईच्या काळात ब्रिटिशकाळात ब्राम्हण जातीचे वर्चस्व होते, पुढे महात्मा फुलेंनी ब्राम्हणी प्रचंड जातीजातीमध्ये तणाव वाढला ज्ञानावर ब्राम्हणाची मक्तेदारी नाकारून प्रवृत्तीला विरोध केला.

OPPO A17 · ©Saurabh Pawar
2023/03/21 08:22

सर्व जातींना वर्गांना ज्ञान मिळविण्याचा हक्क आहे असे स्पष्ट केले तर २० व्या शतकाच्या सुरवातीला कोल्हापूर संस्थानाच्या शाहिरीमध्ये ब्राह्मणेतर चळवळ सुरू झाली. १९२० मध्ये डॉ. आंबेडकरांनी सुद्धा दलित वर्गांना शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला. आंबेडकरांनी जातीच्या आधारावर वेगळ्या मतदार संघाची मागणी केली. दलितांना राजकारणात प्रतिनिधित्व मिळावे म्हणून स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.

७) भारतीय राजकारण व जात संबंधात राजकीय पक्षांची भूमिका :-

भारतीय राजकारणात राजकीय पक्षांची भूमिका महत्त्वाची आहे आज बहुतेक राजकीय पक्ष कोणत्या ना कोणत्या जातीशी निगडीत आहेत त्याचा आढावा पुढीलप्रमाणे आहे :-

१) राष्ट्रीय काँग्रेस पक्ष :-

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला सुरुवातीच्या काळात सर्व धर्मीयांचा पाठिंबा मिळत तर अलिकडच्या काळात मुस्लिमांचा पाठिंबा मिळत आहे.

२) शेतकरी कामगार पक्ष :-

शेतकरी कामगार पक्ष ब्राह्मण वगळून इतर जातींवर आधारलेला पक्ष आहे. मराठा व OBC या जातींचा पाठिंबा मोठ्या लोकांचा मिळत आहे.

३) द्रविड मुन्नेत्र कळघम :-

द्रमुकला तामिळनाडूतील सर्वच जातींमधून सुरवातीपासून पाठिंबा मिळाला कारण त्यांनी सर्वांसाठी समान हक्काची चळवळ उभारली.

४) भारतीय जनता पक्ष :-

भाजपला भारतात हिंदुधर्मातील खासकरून ब्राह्मणजातीचा पाठिंबा मिळाला हळूहळू मराठा समाजाचा, पाटीदार समाजाचा पाठिंबा भाजपाला मिळत आहे.

५) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष :-

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मराठा जातीचा पाठिंबा मिळाला. महाराष्ट्रात या पक्षाला OBC जातींचासुद्धा चांगला पाठिंबा मिळत आहे.

ड) शिवसेना :-

शिवसेनेची स्थापना मराठी अस्मितेच्या आधी, मुंबईत मराठी माणसांना आपली अस्मिता टिकविण्यासाठी शिवसेनेने संघटित केले. परिणामी शिवसेनेला मराठी जातींचा पाठिंबा मिळाला.

इ) बहुजन समाजवादी पक्ष :-

बहुजन समाजवादी पक्षाची स्थापना कांशिराम यांनी केली. उत्तरप्रदेश व बिहारमध्ये दलित जातींचा पाठिंबा बहुजन समाजवादी पक्षाला मिळाला.

सारांश :-

थोडक्यात, आज भारतीय राजकारण विविध जातींच्या पाठिंब्यावर आधारलेला आहे. जातींची अस्मिता राजकारणात प्रभावी ठरत आहे.

४) जात व आरक्षण :-

अ) प्रास्ताविक :-

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकारणात विविध जातींना मिळालेल्या आरक्षणामुळे मोठे फेरबदल होत आहेत. सदृढ लोकशाहीसाठी समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे. त्यामुळेच विविध जातींना आरक्षण दिले गेले.

ब) जात व आरक्षणाची पार्श्वभूमी :-

१९०२ मध्ये कोल्हापूर संस्थानात छत्रपती शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर व मागास वर्गातील लोकांना सरकारी नोकरी आरक्षण जाहीर केले. १९०८ मध्ये ब्रिटिश सरकारने प्रशासनातील विविध पदांवर जातींना आरक्षण दिले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात विविध जातींची भूमिका महत्त्वाची होती. पूर्वी जातीवर व्यवसाय व समाजव्यवस्था आधारलेली होती.

क) स्वातंत्र्योत्तर भारतातील जात व आरक्षण :-

स्वातंत्र्योत्तर काळात घटना कारांनी अनुसूचित जाती जमातीसाठी आरक्षण लागू केले. कलम ३३० ते ३४ मध्ये निवडणुकांमध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आली. १९५० मध्ये १० वर्षासाठी अनुसूचित जाती जमातींना ...

OPPO A17 · Saurabh Pawar
2023/03/21 08:22

आरक्षण लागू करण्यात आले. १९६० मध्ये ८वी घटनादुरुस्ती करून १९७० पर्यंत अनुसूचित जातीजमातींचे आरक्षण १० वर्षांसाठी वाढवले. १९६९ मध्ये २३वी घटनादुरुस्ती करून हे आरक्षण पुन्हा १० वर्षांसाठी वाढविले. १९८९ मध्ये ६२वी घटनादुरुस्ती करून हे आरक्षण पुन्हा १० वर्षांसाठी वाढविले. २००९ मधील ९५वी घटनादुरुस्ती करून हे आरक्षण पुन्हा १० वर्षांसाठी वाढविले. या आरक्षणामुळे भारतीय राजकारणावर वेगवेगळे परिणाम झाले.

ड) लोकसभेतील आरक्षण :-

कलम ३३० नुसार लोकसभेत प्रत्येक घटक राज्यातील व केंद्रशासित प्रदेशातील अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव जागा ठेवल्या आहेत. कलम ३३१ नुसार अँग्लोइंडियन समाजाला दोन जागा ठेवल्या आहेत या आरक्षणानुसार २०१५ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत ५४३ जागांना अनुसूचित जातींना ८४ जागा व अनुसूचित जमातीसाठी ४७% जागा राखीव ठेवण्यात आल्या. अशा पद्धतीने भारतात जात व आरक्षणाची व्यवस्था काम करीत आहे. त्याच १९७८ च्या मंडल आयोगामुळे अनेक बदल झाले.

सारांश :-

भारताच्या संदर्भात जात व आरक्षणाचा विचार करता असे दिसते की स्वातंत्र्यपूर्व काळापासून मागास जातींना समाज प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण दिले गेले. स्वातंत्र्योत्तर काळात सुद्धा समतेच्या दृष्टिकोनातून घटनाकारांनी मागास जातींना सर्वांगीण विकासासाठी आरक्षण दिले. परंतु अलीकडच्या राजकारणात जातीय हिंसा वाढली आहे. ही लोकशाहीसाठी मारक वाटते.

OPPO A17 · ©Saurabh_Pawar

ड] मंडल आयोग :-

अ] प्रास्ताविक :-

भारतात मागास जनजातींना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्यघटनेत आरक्षणाची तरतूद करण्यात आली. मागास समूहांना विविध आयोगांच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक व राजकिय आरक्षण देण्यात आले या प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण उल्लेख म्हणजे मंडल आयोग होय.

ब] मंडल आयोग :-

पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी जनता पक्षाचे सरकार सत्तेवर असताना १९७८ मध्ये श्री. बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षतेखाली १९७८ मध्ये दुसऱ्या मागासवर्गीय आयोगाची स्थापना केली. या आयोगाने भारतातील मागास जनजातींचा अभ्यास करून आपला अहवाल सादर केला.

क] मंडल आयोगाची जबाबदारी :-

मंडल आयोगाने कशा पद्धतीने काम करेल याविषयी मोरारजी देसाई सरकारने त्यांना ५ प्रमुख जबाबदाऱ्या दिल्या

1] एखाद्या वर्गाने एखाद्या समाजाला सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास ठरविण्याचे निकष ठरविणे.

2] मागास वर्गाच्या विकासासाठी उपाययोजना सुचविणे.

3] केंद्र व राज्य सरकारच्या सेवेत मागास वर्गीयांना राखीव जागा ठेवाव्यात की नको याविषयी निर्णय देणे.

4] वरील सर्व बाबींचा अहवाल राष्ट्रपतींना सादर करणे.

ड] मंडल आयोगाचे कामकाज :-

मंडल आयोगाने भारतातील ४०५ जिल्ह्यांमध्ये सामाजिक व शैक्षणिक सर्वेक्षण केले. सामाजिक व शैक्षणिक मागास वर्ग ठरविण्यासाठी ११ निकष तयार केले. त्या दृष्टीने आयोगाने ३००० पेक्षा जास्त समूहांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास ठरविले. अशा मागासांचे भारताच्या लोकसंख्येशी प्रमाण पाहता ते ५२ % इतके आहे.

ई] मंडल आयोगाने सुचविलेले उपाय :-

मंडल आयोगाने १९८० मध्ये राष्ट्रपतींना आपला अहवाल सादर केला त्यात मागास जातींच्या

OPPO A17 · ©Saurabh Pawar
2023/03/21 08:23

Page No.
Date

विकासासाठी पुढील उपाय सुचविले :-

अ] सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गासाठी सरकारी नोकरी २७% आरक्षण द्यावे.

ब] इतर मागास वर्गाच्या उमेदवारांना अधिकत्तम वयाची सवलत लागू करावी.

क] सर्व पातळ्यांवर भरती देतांना सुद्धा आरक्षण लागू करावे.

ड] सलग ३ वर्षे पुरेशा आरक्षित जागेवर भरती न झाल्यास त्या वर्गाचे आरक्षण रद्द करावे.

इ] आरक्षणाचे पोस्टर तयार करावे.

ई] शाळा महाविद्यालये सार्वजनिक व सरकारी संस्थेमध्ये आरक्षण लागू करावे.

उ] मागास जातीतील मुलांसाठी निवासी शाळा, होस्टेल यांची सुविधा द्यावी. प्रश्न ४

फ] मंडल आयोगाच्या अहवालावर स्थगिती :-

१९८० मध्ये मंडल आयोगाने अहवाल सादर केला खरा परंतु त्यावेळी जनता पक्षाचे सरकार जाऊन काँग्रेसचे सरकार (इंदिरा गांधीचे) आले होते. तर १९८० ते १९८९ पर्यंत काँग्रेसचेच राजीव गांधी यांचे सरकार होते त्यांनी हा अहवाल प्रसिद्ध केला नाही. १९९० मध्ये व्ही. पी. सिंग यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर मंडल आयोगाच्या शिफारसी लागू करण्याची त्यांनी घोषणा केली. या घोषणेच्या विरोधात दिल्ली, उत्तरप्रदेश, बिहार येथे प्रचंड दंगली झाल्या. एका विद्यार्थ्याने स्वतःला पेटवून घेतले. परिणामी मंडल आयोगाच्या अहवालावर स्थगिती आणली. १९९० मध्ये व्ही. पी. सिंगाचे सरकार पडले. १९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंहरावर यांनी मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे ठरविले तसेच नरसिंहराव यांनी आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाला सरकारी नोकरीत १०% आरक्षण दिले परिणामी पुन्हा दंगली झाल्या. १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने यावर निकाल दिला. या निकालाने आर्थिकदृष्ट्या मागासांचे १०% आरक्षण रद्द केले. न्यायालयाच्या मते आरक्षण ५०% पेक्षा जास्त असू नये तर बढती आरक्षण नाही. असाही निकाल न्यायालयाने दिला.

OPPO A17 · ©Saurabh Pawar
2023/03/21 08:23

ग] मंडल आयोगानंतरचे राजकारण :-

एखाद्या व्यक्तिने जर धर्म बदलला तर आणि नव्या स्विकारलेल्या धर्माला आरक्षण नसेल तर काय करावे हा मोठा प्रश्न निर्माण झाला. वेगवेगळ्या घटक राज्यात हिंसाचार व दंगली घडू लागल्या. तामिळनाडू 69% आरक्षण दिले गेले. महाराष्ट्रात 52% आरक्षण दिले गेले परिणामी आरक्षणावरून समाजात कटुता निर्माण झाली. असे असले तरी असंख्य मागास जातीतील लोकांना आपला सामाजिक व शैक्षणिक विकास करण्यास मदत झाली.

प्रश्न ५] जमातवाद म्हणजे काय ते सांगून जमातवादाची कारणे स्पष्ट करा. or भारतातील जमातवादाचा ऐतिहासिक संबंध व स्वातंत्र्योत्तर काळातील जमातवाद यांवर चर्चा करा.

अ] प्रास्ताविक :-

OPPO A17 · Saurabh Pawar
2023/

# भारतीय राजकीय व्यवस्थेपुढील आव्हाने
# (Challenges to Indian Political System)

**प्रकरण रचना :**

१५.० उद्दिष्ट्ये
१५.१ प्रस्तावना
१५.२ राजकारणाचे गुन्हेगारीकरण
१५.३ दहशतवाद
१५.४ दहशतवादाची कारणे
१५.५ दहशतवादाचे परिणाम
१५.६ दहशतवादावरील उपाययोजना
१५.७ नक्षलवाद
१५.८ सारांश
१५.९ प्रश्न

## १५.० उद्दिष्ट्ये

भारतीय राजकीय व्यवस्थेपुढील विशिष्ट प्रश्न, समस्यांबरोबर या व्यवस्थेपुढील असलेल्या आव्हानांची चर्चा करणे, विद्यार्थ्यांमध्ये त्याविषयी जाणीव जागृती निर्माण करणे हा या प्रकरणाचा प्रमुख उद्देश आहे.

## १५.१ प्रस्तावना

शेकडो वर्षाची मुस्लिम राजवट व दिडशे वर्षाच्या ब्रिटिश गुलामगिरितून १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. भारत स्वतंत्र झाला तेव्हा ब्रिटिशांनी इथल्या साधनसंपत्तीची केलेली लूट, फाळणीमुळे निर्माण झालेले धार्मिक दंगे इत्यादीमुळे भारतीय समाजकारण आणि राजकारणात अनेक समस्या निर्माण झालेल्या होत्या. त्या काळात शिक्षणाचा प्रसार करणे मागासलेल्या वर्गाची उन्नती करणे, सामाजिक, धार्मिक सामजंस्य निर्माण करणे, औद्योगिक क्षेत्राचा विकास करणे, दारिद्र्य-बेरोजगारी निर्मूलन करणे, इ. अनेक आव्हाने भारतीय राजकीय व्यवस्थेपुढे होती. परंतु अलिकडील काळात या समस्या दुर्लक्षित होऊन

नविनच समस्या व आव्हाने निर्माण झालेली आहेत. लोकशाहीत सत्ता हस्तगत करणे हाच राजकारणाचा उद्देश झाल्याने ती हस्तगत करण्यासाठी अनेक गैरमार्गांचा अवलंब करण्यात आला. त्यातून प्रथम राजकारणासाठी गुंडांचा वापर केला जात असे तर आज प्रत्यक्ष गुंडांनीच राजकारणात प्रवेश करुन राजकारण हे दहशत निर्माण करणे, अमाप पैसा मिळविणे, बेकायदेशीर धंदे करण्याचे साधन बनविले आहे. म्हणजेच राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले आहे. तर धर्मांतधतेच्या वृत्तीतून दहशतवादाची समस्या निर्माण झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात श्रीमंत वर्गाचा अनिर्बंध विकास झाला व त्यातून शोषणाची व्यवस्था निर्माण झाली. शोषित वर्गाने हिसेंच्या मार्गाचा स्वीकार केला. त्यातूनच नक्षलवादाची समस्या निर्माण झाली. या सर्व समस्या निर्मूलनाच्या आव्हानांची चर्चा सदर प्रकरणात केलेली आहे.

## १५.२ राजकारणाचे गुन्हेगारीकरण (Criminalisation of Politics in India)

राजकारणाचे गुन्हेगारीकरण म्हणजे गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना राजकारणात येण्यास संधी देणे आणि त्यांचा प्रभाव वाढविणे होय. गुन्हेगारी टोळ्यांच्या ठराविक जागा व भाग असतात व त्या ठराविक भागात त्यांचेच साम्राज्य असते. उदा. हातभट्टी चालवणारा दादा आपल्या भागातील परिसरावर पूर्ण नियंत्रण ठेवतो. तेथील मतदारांवर त्याचा वचक असतो, तेथील आमदार, खासदार, नगरपालक यांच्याशी त्याचे उठणे बसणे असते. राजकारणी लोकांचा डोळा अशा झोपडपट्टीतील एकगठ्ठा मतांकडे असल्याने ते अशा दादांच्या (गुन्हेगारांच्या) व्यवहाराकडे दूर्लक्ष करतात. पोलीस यंत्रणेलाही आपल्यात सहभागी करुन घेतात. अशाप्रकारे अनधिकृत उद्योग करणाऱ्या गुंडांना, दादा लोकांना राजकीय संरक्षण असते.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण भारतीय राजकीय व्यवस्थेत आढळून येते. गुन्हेगार, स्मगलर्स, इत्यादींची मदत घेऊन निवडून येणे, त्यांच्याकडून आर्थिक साहाय्य घेणे हा प्रकार फार पूर्वीपासून भारतीय राजकारणात होता. सध्या तर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले अनेक लोक स्वतःच निवडणूकीला उभे राहतात. पैशाच्या व दहशतीच्या जोरावर हे लोक निवडूनही येतात. गुन्हेगारांना मानमरातब व सन्मान मिळू लागला आहे. गुन्हेगारांनी ग्रामपंचायतीपासून विधानसभा व संसदेपर्यंत प्रवेश मिळविला आहे. गुन्हेगारी जगतातील चोरटा व्यापार करणारे माफीया टोळ्यांचे सूत्रधार, अंमली पदार्थांचा व्यापार करणारे तस्कर यांचा समावेश होतो. यांच्याशी संबंध नाही असा राजकीय पक्ष व राजकारणी सापडणे आज कठीण आहे. संधीसाधू राजकारणी व स्वार्थी गुंड यांची युती झाली आहे.

### १५.२.१ राजकारणाचे गुन्हेगारीकरण्याचे भारतीय राजकीय व्यवस्थेवर पुढील परिणाम झालेला दिसतो :

१. लोकशाहीला धोका निर्माण झाला आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोक निवडून आले की लोकशाहीला धोक्यात आणतात. गुंड प्रवृत्तीचा विकास होतो.

२. समाजाची शांतता, सुव्यवस्था, सुरक्षा, नैतिकता नष्ट होते. गुंडांच्या अरेरावीमुळे व पोलीस यंत्रणेने तिकडे दुर्लक्ष केल्याने देशात वारंवार सुव्यवस्थेचा भंग होतो. सामान्य जनांना गुंड आणि राजकीय यांची युती त्रासदायक ठरू लागली आहे.

३. लोकांचा राजकीय व्यवस्थेवरील विश्वास नष्ट होतो. स्वतंत्र व निपक्षपाती निवडणूकीच्या काळात मतदारांवर दहशत निर्माण करणे, उमेदवारांना पळविणे, मतपेट्या पळविणे या कामासाठी संपत्ती व शक्तीचा वापर केला जातो. राजकारणी म्हणजे भ्रष्टाचारी व गुन्हेगार अशीच सर्वसामान्यांची कल्पना झाली आहे.

४. सामान्य मनुष्य राजकीय प्रक्रियेला विटून गेला आहे. राजकारणाकडे तो एक घाणेरडा खेळ म्हणून पाहू लागला आहे. उत्तर प्रदेशात ८३६ लोकांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असूनही त्यांनी विधानसभा निवडणूक लढविली. नगरपरिषदा, जिल्हापरिषद, महानगरपालिका, ग्रामपंचायती इत्यादी ठिकाणी तर समाजविघातक प्रवृत्तींचे गुन्हेगार यांचेच वर्चस्व दिसून येते.

**आपली प्रगती तपासा :**

१) राजकारण आणि गुन्हेगारी यातील सबंध स्पष्ट करा.

२) 'राजकारणाचे गुन्हेगारीकरण' यावर टीप लिहा.

---

---

---

---

## १५.३ दहशतवाद

**दहशतवादाचा अर्थ - व्याख्या :**

दहशतवाद ही अत्यंत गुंतागुंतीची व वादग्रस्त संकल्पना आहे. एक राष्ट्र ज्यांना दहशतवादाची म्हणते त्यांना दुसऱ्या (विरुद्ध) देशातील लोक स्वातंत्र्य सैनिक, शहिद म्हणतात. म्हणून ही संकल्पना उद्दिष्ट, परिस्थिती आणि राष्ट्र, प्रदेश यानुसार बदलणारी आहे. त्यामुळेच दहशतवादाची व्याख्या निश्चित काय असावी यासबंधी विद्वानांमध्ये एकमत नाही. असे असले तरी काही व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

१) ब्रायन जेनकिन्स यांच्या मते, "राजकीय बदल घडवून आणण्यासाठी बळचा केलेला वापर किंवा वापर करायची धमकी म्हणजे दहशतवाद होय."

२) पेग्विन राज्यशास्त्र शब्दकोशानुसार "आमुलाग्र राजकीय आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा उद्देशाने शासनावर दबाव आणण्यासाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब करणे म्हणजे दहशतवाद होय."

अशा प्रकारे शांततामय व घटनात्मक मार्गावर विश्वास नसणाऱ्या लोकांकडून जाणीवपूर्वक हिंसाचाराचा मार्ग अबलंबिला जातो त्यांच्या कृती याच दहशतवादी कारवाया होत. बॉम्बस्फोट घडविणे, अपहरण करणे, हत्या करणे, भीती, दरारा निर्माण करणे ही त्यांची साधने आहेत.

भारतात दहशतवादाची समस्या पंजाबपासून सुरु झाली. १९८४ मध्ये पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची त्यांच्या शीख अंगरक्षकांनी केलेली हत्या, १९९१ साली श्री. राजीव गांधी यांची एल.टी.टी.ई. ने घडवून आणलेली हत्या दहशतवादाची ज्वलंत उदाहरणे आहेत.

**१५.३.१ उत्तर-पूर्व भारत (उत्तरांचल) :**

आसाम, मेघालय, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, मणिपूर आणि नागालॅण्ड या सात राज्यांचा या भागात समावेश होतो. या सात राज्यांना उत्तर भारताच्या सात बहिणी असे संबोधले जाते. या राज्यांना, केंद्र शासनाला आणि या राज्यातील लोकांना सतत तणाव असतो. केंद्रशासन या प्रदेशांकडे दूर्लक्ष करीत आहेत असा आरोप केंद्रशासनावर या राज्यांचा असतो.

मणिपूर आणि नागालॅण्ड यांच्यात सीमेवरून वाद आहेत. आसाम, नागालॅण्ड, मिझोराम, त्रिपूरामध्ये रोजच बंडखोरीच्या अनेक घटना आणि प्रादेशिक चळवळी होतात. या राज्यांमधील बहतुतेक संघटना स्वतंत्र राज्याची किंवा प्रादेशिक स्वायतत्तेची मागणी करीत आहेत. द नॅशनल सोशॅलिस्ट कौन्सिल ऑफ नागालॅण्ड इसाक मुव्हीव्ह (NSCN-IM) स्वतंत्र नागालॅण्डची मागणी करतात. भारतातील लष्करी छावणीवर तेथील बंडखोरांनी अनेकदा हल्ले केलेत.

**१५.३.२ आसाम :** या भागातील एक अतिशय महत्त्वाचे राज्य आहे. बांगलादेशातून येणाऱ्या घूसखोरांची आणि आसाममध्ये स्थायी होणाऱ्या लोकांची आसामची मुख्य समस्या आहे. अजूनही दहशतवाद ही या राज्यातील मुख्य समस्या आहे. भारतीय लष्कर अजूनही आसाममधील दहशतवाद थांबवू शकले नाही.

**१५.३.३ त्रिपूरा :** या राज्यातही दहशतवादाची मुख्य समस्या आहे. येथे येणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांनाही शासन अजूनही थांबवू शकले नाही. स्थानिय पोलीस, राजकारणी यांच्यावर हल्ले, लष्करी छावणीवर हल्ले या राज्यातील एक काळजीचा विषय आहे.

**१५.३.४ बिहार :** बिहार राज्यात कायदा आणि सुव्यवस्था याकडे तेथील शासनाचे पूर्ण दुर्लक्ष झाल्यामुळे बिहारमध्ये लोकांचे जीवन सुरक्षित नाही. बंडखोरी आणि लुटमार या तणावाखाली हे राज्य आहे.

**१५.३.५ आंध्रप्रदेश :** या राज्यातही दहशतवादाची मुख्य समस्या आहे. या भागात नक्षलवाद मोठ्या प्रमाणात फोफावला आहे. श्रीमंत जमिनदारांवर हल्ले करुन समाजात समता प्रस्थापित करणे या विचारांवर आधारीत नक्षलवादी कारवाया करतात. हिंसाचार करुन आपल्याकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करतात. बहुराष्ट्रीय कंपन्या, पोलीस, जमीनदार, लष्कर हे नक्षलवाद्यांच्या हल्ल्यांचे केंद्र आहे.

**१५.३.६ जम्मू आणि काश्मिर :** हे राज्य म्हणजे दहशतवादी राज्य झालेले आहे. येथील दहशतवाद पाकिस्तानच्या प्रेरणेने घडतो. पाकिस्तानामध्ये प्रशिक्षण घेऊन तरुण या प्रदेशात घुसखोरीतून येतात आणि दहशतवादी कारवाया करतात. संपूर्ण भारतात उदा. दिल्लीमध्ये संसदेवरील हल्ला (२००१), मुंबईमध्ये लोकल ट्रेनमध्ये झालेले हल्ले (२००६) अशी कितीतरी

उदाहरणे या दहशतवादी हल्ल्यांची आहेत. प्रत्येक दिवशी वर्तमानपत्र उघडल्यावर दहशतवादी हल्ले, कारवाया यासंबंधीच्या बातम्या दिसून येतात. या बातम्या सामान्य माणसाचे लक्ष वेधून घेतात. दहशतवादी कृत्ये ही मुद्दाम घडवून आणलेले हिंसात्मक कृत्ये असतात. दहशतवादावरील तज्ज्ञ ब्रायन जेनकिन्स यांनी १९७४ साली म्हटले की, 'दहशतवाद म्हणजे नाट्य आहे.'

रोज कुठेनाकुठे निष्पाप माणसे अतिरेक्यांच्या हल्ल्याला बळी पडत असतात. भारत व पाकिस्तानमधील तणावाचे काश्मिर हे मुख्य कारण आहे. काश्मिर प्रश्न सोडविण्यासाठी पाकिस्तानने दहशतवादाचा आश्रय घेतला आहे. काश्मिरची अर्थव्यवस्था मुख्यतः पर्यटनावर आधारीत आहे. काश्मिरमध्ये डिसेंबर-२००२ पर्यंत १४००० व्यक्ती अतिरेक्यांच्या कारवायांना बळी पडल्या आहेत. संपत्तीचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान झाले आणि लाखो लोक निर्वासित झाले. शासनाला लष्करावर प्रचंड खर्च करावा लागतो आहे.

पाकिस्तान पुरस्कृत संसदेवरचा हल्ला तसेच ताज हॉटेल, सी.एस.टी. रेल्वे स्टेशनवरील बेधुंद गोळीबार हेच दाखवून देते की या संघटना किती भीषण आहेत. त्यांना भारतात अराजक माजवावयाचे आहे.

**१५.३.७ पंजाबमधील दहशतवाद :** पाकिस्तानला दहशतवादी कारवाया करायची पहिली संधी पंजाबमध्ये मिळाली. पंजाबमधील अतिरेकी स्वतंत्र राज्याची 'खलिस्तान' ची मागणी करत होते. सुवर्णमंदिरात अतिरेकी आश्रय घेत असे. तेथे अतिरेकी कारवाया प्रमाणाबाहेर वाढू लागल्यावर भारतीय शासनाने सुवर्णमंदिरात लष्कर पाठविले. 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार' मध्ये मुख्य दहशतवादी भिंद्रनवाले मारला गेला. त्यावेळीच्या शासनाने पंजाबमधील दहशतवाद संपविला. तेथील परिस्थिती आता सुधारली आहे.

**१५.३.८ नक्षलवादी :** आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगड, ओरीसा, मध्यप्रदेश, बिहार, झारखंड, उत्तरप्रदेश ही राज्ये नक्षलवादी कारवायांनी ग्रस्त झालेली आहेत. काही तज्ज्ञांच्या मतानुसार १५ राज्यातील ५३ जिल्हे नक्षलवाद्यांच्या प्रभावाखाली आहेत.

नक्षलवाद्यांचे दोन गट आहेत. पिपल्स वॉर ग्रुप (सीपीआय) आणि माओअिस्ट कम्युनिस्ट सेंटर (एमसीसी) त्यांच्या तत्त्वांप्रमाणे नक्षलवादी हिंसाचार शोषणाविरुद्ध असतो. नेपाळमधील माओवादी बंडखोरांशी नक्षलवाद्यांचे संगनमत असल्याचेही आढळून आले आहे.

**१५.३.९ मुंबई** :- १३ मार्च, १९९३ रोजी मुंबईवर पहिला अतिरेकी हल्ला झाला. त्यानंतर मुंबईवर सातत्याने अतिरेक्यांचे हल्ले झाले. मुंबईची प्रचंड लोकसंख्या व त्या लोकसंख्येत रोज पडणारी भर यामुळे मुंबई हे अतिरेक्यांसाठी लक्ष ठरते. प्रत्येक हल्ला झाल्यानंतर 'गुप्तचर यंत्रणेचे अपयश' एवढेच कारण दिले जाते. ११ जुलै, २००६ रोजी मुंबईतील लोकलगाड्यांमध्ये केलेल्या हल्ल्यांचा उद्देश देशाच्या आर्थिक राजधानीत अस्थिरता निर्माण करणे हा होता.

थोडक्यात, दहशतवाद म्हणजे उघडपणे कायद्याला आव्हान देऊन त्याचा भंग करणे होय, दहशतवादी मार्गाचा अवलंब करून शासनाच्या आणि लोकांच्या मनात दहशत निर्माण करणे व आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करणे होय. उदा. भारताच्या ईशान्य भागातील नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा या प्रदेशात बंडाळी करून शासनाला जेरीस आणण्याचा

प्रयत्न केला जातो. आंध्र प्रदेशातील तेलंगणा, पंजाब, काश्मिर, गडचिरोली इत्यादी भागातील नक्षलवाद्यांच्या दहशतवादी बंडाळ्या आपल्याला नवीन नाहीत. कोणतेही दहशतवादी कृत्य म्हणजे फक्त एक घटना नसते. ती एक प्रक्रिया असते. त्या कृत्याचे अल्पकालीन तसेच दीर्घकालीन परिणाम असतात.

**आपली प्रगती तपासा :**

१) 'दहशतवाद' ही संकल्पना स्पष्ट करा.

२) विविध राज्यातील दहशतवादी कारवायांचा आढावा घ्या.

---

---

---

---

## १५.४ दहशतवादाची कारणे

१) **स्पर्धात्मक राजकारण आणि दहशतवाद्यांना राजकारण्यांचा आश्रय** :- यामुळे दहशतवादाला पाठिंबा मिळतो. अनेक दहशतवाद्यांना राजकीय संरक्षण असल्याचे सिद्ध झाले आहे.

२) **शत्रूराष्ट्र** :- दहशतवादी प्रवृत्तींना प्रोत्साहन देणे, त्यांना आर्थिक सहाय्य देणे, प्रशिक्षण देणे, शस्त्रे पुरविणे इत्यादी कृती अनेक राष्ट्रे करतात. दहशतवाद्यांच्या मदतीने शेजारील शत्रू राष्ट्रांमध्ये अंदाधुंदी, तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हा त्यामागे उद्देश असतो.

३) **भ्रष्टाचारी पोलीस यंत्रणा आणि प्रशासकीय व्यवस्था** :- स्थानिय पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणा दहशतवादासाठी फार मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत. या वर्गाने कोणत्याही प्रकारच्या लाचलुचपतीला व दडपणाला बळी न पडता आपले कार्य केल्यास दहशतवादाला प्रतिबंध घालता येईल.

४) **भारताची आर्थिक स्थिती** :- असे आढळून आले आहे की, दारिद्र्य, बेकारी, विषमता, शोषण, मागासलेपणा यामुळे अनेक तरुण दहशतवादी संघटनांमध्ये सामील होतात.

५) **लोकांची वृत्ती** :- दिवसेंदिवस लोक स्वकेंद्रित बनत आहेत. आपल्याला इतरांचे काय ? ही वृत्ती बळावत आहे. पैसा आज लोकांचा देव झाला आहे.

इत्यादी कारणे भारतातील दहशतवादासाठी कारणीभूत आहेत.

## १५.५ दहशतवादाचे सामाजिक परिणाम

दहशतवादी कृत्ये म्हणजे समाजात हिंसाचार वाढीस लावणे. खरं म्हणजे दहशतवाद म्हणजे समाजातील वाईट प्रकारचा हिंसाचार. ज्यामुळे भयमुक्त समाज निर्माण होऊ शकत

नाही. दहशतवादामध्ये तरुणांचा वापर घातक कारवायांसाठी केला जातो. वित्तहानी, प्राणहानी होते.

### १५.५.१ दहशतवादाचे आर्थिक परिणाम :

दहशतवादावर अनेक तज्ज्ञांचे असे मत आहे की, भारतासारख्या गरीब देशामध्ये पैसा हे दहशतवादी संघटनांकडे आकर्षित होण्याचे प्रमुख कारण आहे. मागास भागातील तरुण अशा गोष्टींकडे चटकन आकर्षित होतात. उदा. गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात उद्योगधंद्यांच्या पूर्ण अभावामुळे तरुणांचा ओढा पैसा देणाऱ्या अशा संघटनांकडे जातो. अतिरेकी संघटना आपले अर्थसहाय्य स्वतःच करतात. एलटीटीई बद्दल असे वृत्तांत सापडतात की, जगात कुठेही काम करणाऱ्या जाफनातल्या तामिळींना आपल्या उत्पन्नाच्या १०% भाग एलटीटीईला द्यावा लागतो. उत्पन्नाच्या अशा साधनांमुळे दहशतवादी संघटनांना आपल्या कारवाया सातत्याने चालविता येतात.

दहशतवाद्यांच्या आर्थिक परिणामांची आणखी एक बाजू म्हणजे दहशतवादी कारवायांमुळे त्या भागात गुंतवणूक करायला उद्योजक तयार होत नाही. त्यामुळे दहशतवादाने ग्रस्त झालेला भाग आर्थिकदृष्ट्या मागासलेला राहतो.

### १५.५.२ दहशतवादाचे राजकीय परिणाम :

दहशतवादाचा उपयोग काही विशिष्ट उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी केला जातो. उदा. विमानांचे अपहरण करुन शासनासमोर काही मागण्या करण्यात येतात. विमानातील प्रवाशांचे हित लक्षात घेऊन शासनाला त्या मागण्या मान्य कराव्या लागतात.

दहशतवादी जर आपल्या कारवायांमाध्ये सातत्याने यशस्वी होत राहिले तर लोकांचा शासनावरील विश्वास कमी होईल. जनतेला आपण निराधार आहोत असे वाटेल आणि शासन अकार्यक्षम असल्याची भावना जनतेत निर्माण होईल.

## १५.६ दहशतवादावरील उपाययोजना

जागतिक स्तरावर हिंसाचार घडवून विध्वंस करणे हा दहशतवाद्यांचा मुख्य उद्देश आहे. सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक अशा सर्वच प्रकारच्या व्यवस्थेबद्धल आलेले निराशाजनक अनुभव व वैफल्यग्रस्तता तसेच साम्राज्यवाद, वसाहतवाद इ. च्या परिणामातून दहशतवाद्याचा उदय झालेला आहे. याशिवाय शत्रुराष्ट्राला सतत युद्धजन्य व तणावपूर्ण स्थितीत ठेवण्यासाठी काही राष्ट्राकडूनही दहशतवादाला प्रोत्साहन दिले जाते. या सर्व स्थितीचा विचार करता त्यावर उपाययोजनाही याच्याशी सबंधित असल्या पाहिजेत. काही उपाय योजना पुढीलप्रमाणे सुचविता येतील.

१) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सहकार्याचा पुरस्कार करणाऱ्या राष्ट्रांनी संघटीतपणे दहशतवादी कारवायांना विरोध करणे व दहशतवादी हल्ले होणाऱ्या राष्ट्राला लष्करी मदत पुरविणे.

२) दहशतवादी कारवायांना पाठिंबा देणाऱ्या राष्ट्रांनी भविष्य काळातील धोका लक्षात घेऊन दहशतवाद्यांना मदत करणे बंद करणे.

३) दहशतवाद्यांच्या जाळ्यात अडकणाऱ्या तुरणांवर लक्ष केंद्रीत करुन त्यांचे बेरोजगारी, अज्ञान इ. प्रश्न दूर करुन त्यांना अशा कृतीपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करणे.

४) देशांतर्गत धार्मिक, सांस्कृतिक एकात्मता निर्माण करण्यावर भर देणे. धार्मिक अल्पसंख्यांकाना राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी निश्चित धोरण आखणे आवश्यक आहे.

५) लष्करी व संघर्षपूर्ण कारवायांबरोबरच चर्चा, वाटाघाटी, प्रबोधन, गैरसमज दूर करणे इ. माध्यमातून दहशतवाद कमी करण्यासाठी प्रयत्न करणे.

६) प्रशासकीय क्षेत्रातील वशिलेबाजी, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता दूर करणे आवश्यक आहे. भारतावरील दहशतवाद्यांचा हल्ल्यांशी अशा गोष्टींचा जवळचा सबंध आहे.

७) इलेक्ट्रॉनिक व प्रसार माध्यमांतून दहशतवाद्यांना मिळणारी प्रसिद्धी कमी करणे.

८) जी राष्ट्रे दहशतवाद्यांना मदत करतात अशा राष्ट्रांना दहशतवादी राष्ट्र घोषित करुन आंतरराष्ट्रीय स्तरावर अशा राष्ट्राशी असलेले व्यापारी, आर्थिक व इतर प्रकारचे सबंध स्थगित करावेत.

अशा उपाययोजानांच्या माध्यमातून दहशतवादावर नियंत्रण आणणे शक्य आहे. परंतु त्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याची व संघटीत संघर्षाची गरज आहे. याशिवाय प्रत्येक राष्ट्रातील विशेषतः भारतातील नेत्यांनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून दहशतवाद्यांचा मुद्यावर एकत्र येणे आवश्यक आहे. 'प्रथम राष्ट्र नंतर पक्ष' अशी भूमिका घेणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) दहशतवादाची कारणे व परिणाम यावर चर्चा करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १५.७ नक्षलवाद (Naxalism)

ब्रिटिश साम्राज्याच्या काळात उदयास आलेली सरंजामशाही व जमीनदारी पद्धती, आदिवासीचे जंगलावरील आणि शेतजमीवरील संपुष्टात आलेले हक्क, आणि भारतीय समाव्यवस्थेतील आदिवासी आणि गरीब लोकांच्या शोषणाची व द्वेषाची प्रवृत्ती या परिस्थितीत नक्षलवादी चळवळीची बीजे आहेत. या परिस्थितीच्या विरुद्ध आदिवासी, दलित, शोषित यांनी जमिनदार, सावकार यांच्या विरोधात हिंसात्मक पद्धतीने केलेली चळवळ म्हणजेच नक्षलवादी चळवळ होय. या चळवळीची सुरुवात पश्चिम बंगालमधील दार्जिलींग जिल्ह्यातील 'नक्षलवादी' या गावातून झाली. म्हणून त्याला 'नक्षलवादी' चळवळ असे म्हणतात.

२ मार्च १९६७ मध्ये नक्षलवादी गावात जमीनदाराच्या गुंडांनी एका शेतकऱ्याला मारले. त्या घटनेच्या दुसऱ्याच दिवशी जमीनीच्या एका मोठ्या भागाला लाल रंगाच्या झेंड्यांनी घेराव घालून जमिन खणण्यास सुरुवात केली. पोलिसांनी या शेतकऱ्यांवर हिंसात्मक कारवाई केली त्या

बदल्यात शेतकऱ्यांनी एका सबइन्स्पेक्टरची हत्या केली. पोलिस आणि शेतकरी, आदिवासी यांच्यात संघर्षाला सुरुवात झाली. जमिनदार, सावकार व पोलीस, सरकारी अधिकारी यांच्या अत्याचाराला बळी पडलेले आदिवासी व जाती प्रथेला त्रासलेले लोक संघटीत झाले. चार महिन्यात शेतकरी सभेच्या सभासदांची संख्या चार लाख झाली. कानु सन्याल, चारु मुजुमदार, मुजिबुर्रहान यांनी त्यांचे नेतृत्व केले. या नेतृत्वावर साम्यवादी (मार्क्स) चा प्रभाव होता. या चळवळीत चीनचा पाठिंबा होता. आजही या चळवळीला देशांतर्गत व विदेशातूनही पाठिंबा मिळत आहे. ही चळवळ भारतात दहा राज्यात व एकशे ऐंशी जिल्ह्यांमध्ये पसरलेली आहे. विशेषतः महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर तसेच यवतमाळ, व किनवटचा काही भाग अशा मोठ्या प्रमाणावर जंगल प्रदेश असलेल्या जिल्ह्यामध्ये या चळवळीचे लोन पसरलेले आहे. अलिकडील काळात शहरी भागातही या चळवळीचा प्रसार होत आहे. तिने भारतीय राजकीय व्यवस्थेलाच आव्हान दिले आहे. यावरुन या चळवळीचे गंभीर स्वरुप लक्षात येते.

### १५.७.१ नक्षलवादी चळवळीचे ध्येय, धोरण व वैचारिक भूमिका :

नक्षलवाद (Laxalism) या शब्दात 'वाद' (ism) हे शब्द आहेत. यावरुन ती एक विचारधारा म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या चळवळीची निश्चित ध्येये, धोरणे, कार्यक्रम, नेतृत्व व विचारधारा आहे. त्यांची वैचारिक भूमिका पुढीलप्रमाणे :

१) नक्षलवाद्यांच्या मते भारताला केवळ नाममात्र स्वातंत्र्य मिळाले आहे. ब्रिटीश गेले आणि वसाहती सदृश्य, सरंजामीसदृश्य व्यवस्था आली. काँग्रेस, मुस्लिम लीग, हे ब्रिटिश व्यवस्थेचे दलाल आहेत. ही व्यवस्था बदलण्यासाठी क्रांतीकारी उठावाशिवाय पर्याय नाही.

२) काँग्रेस शासन हे जमीनदार, सरंजामदार, सरदार, नोकरशाह आणि भांडवलदारांचे हितसबंध जपणारे आहे. भांडवलदारामार्फत परकीय आर्थिक हितसबंध जोपासले जातात. भारताचे परराष्ट्र धोरण अमेरिका धार्जिण आहे.

३) जमीन सुधारणा कायदे, जमिनीचे केंद्रीकरण, मालकी हक्क मुठभर लोकांच्या हाती, शेतमजूरांची पिळवणूक, बेरोजगारी, सावकारी व भरमसाठ व्याजाद्वारे शोषण, दलित आदीवासीचे शोषण ही सरंजामशाही व्यवस्थेची वैशिष्ट्ये भारतात दिसून येतात.

४) नोकरशाही, भांडवलशाही, सरंजामशाही अमेरिकन साम्राज्यवादाला पूरक आहे.

५) वरील परिस्थितीमुळे कृषिक्रांती घडविणे आवश्यक आहे.

६) संघर्ष आणि परिवर्तनाचे साधन सशस्त्र संघर्षाचा पुरस्कार करणे.

७) प्रस्थापित शासनास जन पाठिंबा नाही ते शासन लष्कराच्या सहाय्याने टिकून आहे. प्रतिनिधिक व्यवस्था कुचकामी व दिखावू स्वरुपाची आहे.

८) आंतरराष्ट्रीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक नेतृत्व कार्यरत राहील.

९) ग्राम पातळीवरील सत्ता श्रीमंत शेतकरी, जमिनदार वर्गाकडून काढून शेतकऱ्याच्या स्वाधीन केली जाईल व त्याद्वारा 'लाल दहशत' निर्माण केली जाईल.

वरील प्रमाणे नक्षलवादी चळवळीची ध्येय धोरणे व वैचारिक भूमिका आहेत.

**१५.७.२ ध्येय धोरणांच्या अम्मल बजावणीचा मार्ग किंवा कार्यक्रम :**

संसदीय पद्धती, घटनात्मक मार्ग, किंवा शांततामय व कायदेशीर मार्गावर नक्षलवाद्यांचा विश्वास नाही. त्यांच्या विचारांवर माओ-त्से-तुंग यांचा प्रभाव असल्याने 'क्रांतीचा मार्ग बंदुकीच्या नळीतून जातो' हे त्यांनी मान्य केले आहे. म्हणूनच हिंसक कारवायाच्या मार्गानेच ध्येय साध्य करण्यावर भर दिला जात आहे.

१) सावकारांवर धाडी घालणे.

२) पोलीसांना ठार मारणे, सरकारी पोलीस यंत्रणेला आव्हान देणे.

३) जमीनदार वर्ग शत्रू मानून त्यांच्या हत्या करणे, व त्यांच्याकडील धान्य व अन्य वस्तू गरिबांना वाटणे.

४) वन जमिनींचा ताबा घेऊन त्या शेतकऱ्यांना देणे.

५) अफवा तंत्राचा अवलंब करुन चाकू, भाले, तलवारी, बॉम्ब इत्यादींचा वापर करुन खून करणे, इमारतींना नुकसान करणे, शासकीय यंत्रणा कमी करणे.

६) निवडणुक प्रक्रियेवर घाला घालणे, मतदान केंद्रे ताब्यात घेणे, मतदारांमध्ये दहशत पसरविणे.

अशा प्रकारे आपली ध्येये, धोरणे अमलात आणण्यासाठी हिंसक मार्गाचा अवलंब करणे व त्यात शेतकरी, कामगार, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी यांना सहभागी करुन घेण्यावर भर दिला जातो.

**१५.७.३ नक्षलवादाची कारणे :**

नक्षलवादी चळवळीचा उगम आणि त्यांची ध्येय धोरणे यात नक्षलवादी हिंसात्मक चळवळीची कारणे स्पष्ट झालीच आहेत ती पुढीलप्रमाणे :

१) कायद्याने जमीनदारी पद्धती नष्ट केली असली तरी कायद्यांची योग्य अंमलबजावणी न झाल्याने छुप्या अवस्थेत ती आजही आहे. जमीनदारी पद्धतीत छोटे शेतकरी, कुळ, मजूर यांचे आर्थिक, मानसिक शारिरीक शोषण केले जाते. हेच या चळवळीच्या उगमाचे प्रमुख कारण आहे.

२) स्वातंत्र्यानंतरही आदीवासी बहुतेक भागात रस्ते, वीज, पाणी, दवाखाने, शिक्षण या मूलभूत सुविधा शासन निर्माण करु शकले नाही. त्यामुळेच अज्ञानी, निरक्षर लोकांचे शोषण जमीनदार व प्रस्थापित वर्गाकडून केले जाते.

३) पोलिस, सरकारी अधिकारी यांच्याकडून हे आदीवासी, दलित जमातीतील गरिबी, अज्ञान, निरक्षरतेचा फायदा घेवून त्यांचे सर्व बाजूंनी होणारे शोषण. इ. दहशतवादाची कारणे आहेत.

**१५.७.४ नक्षलवादावरील नियंत्रणाचे प्रकार :**

नक्षलवाद ही राष्ट्रीय गंभीर समस्या बनली आहे. त्यामुळे ही समस्या सोडविण्यासाठी राज्य व केंद्रीय पातळीवर सतत प्रयत्न केले जातात. काही उपाय व शासकीय प्रयत्न पुढीलप्रमाणे :

१) आदिवासीना न्याय व हक्क मिळवून देणे.

२) उद्योगपती, बहुराष्ट्रीय कंपन्या, सावकारी, जमीनदार, खनिज संपत्तीची लूट करणारे माफिया, शोषण करणारी यंत्रणा इ. चा नायनाट करणे.

३) जमीन सुधारणा कायद्याची योग्य अंमलबजावणी करुन त्यांना त्यांच्या जमिनी व त्यावरील हक्क मिळवून देणे.

४) विकासाच्या योजना त्यांच्यामार्फत पोहचविणे.

५) रोजगार निर्मिती करुन युवकांना मुख्य प्रवाहात आणणे.

६) पोलीसी कारवायांपेक्षा त्यांच्या प्रबोधनावर, मतपरिवर्तनावर भर देणे.

७) आदिवासी बहुल भागात पायाभूत सुविधा निर्माण करणे.

८) राजकीय पक्षांनी स्वार्थी राजकारण बाजूला ठेवून राष्ट्रहिताच्या भूमिकेतून सर्वांनी सहकार्याने या प्रश्नावर उपाय शोधने आवश्यक आहे.

९) भूमिपुत्रांना त्यांचे हक्क प्रदान करुन ही व्यवस्था आपली आहे अशा विश्वास त्यांच्यात निर्माण करणे आवश्यक आहे.

१०) नक्षलवाद्यांशी लढा देण्यासाठी राज्य व केंद्र सरकारच्या धोरणात समन्वय असला पाहिजे.

११) भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांवर कारवायी केली पाहिजे.

१२) शरणागती पत्करणाऱ्या नक्षलवाद्यांना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या मोबदल्यात वाढ करणे, त्यांनी शासकीय नोकरीत सामावून घेणे.

१३) वनहक्क कायद्यांची योग्य अंमलबजावणी करणे.

### १५.७.५ नक्षलवादी समस्या सोडविण्यातील अडथळे व आव्हाने :

नक्षलवादी चळवळीने आज इतके गंभीर स्वरुप धारण केले आहे की त्यावर उपाययोजना सुचविणे सोपे आहे परंतु त्या अमलात आणणे कठीण आहे. त्याचे काही कारणे :

१) शासनाच्या कोणत्याही कृतीवर नक्षलवाद्यांचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळेच शासनाने नक्षलवादी भागात रस्ते, वीज, मोबाईल टॉवर्स इ. सुविधा उभारण्याचा प्रयत्न केल्यास त्या नक्षलवद्यांकडूनच उध्वस्त केल्या जातात.

२) नक्षलवाद्यांचा सामना करण्यासाठी केंद्रीय राखीव पोलीस दल, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, सशस्त्र सीमा बल आणि राज्य पोलिस दले कार्यरत आहेत. परंतु या सर्वांमध्ये परस्पर समन्वयाचा अभाव आहे. प्रत्येकाची भूमिका व जबाबदारी याची स्पष्टता नाही.

३) सुरक्षा रक्षकांच्या गुप्तचर यंत्रणापेक्षा नक्षलवाद्यांची गुप्तचर यंत्रणा प्रभावी आहे.

४) आज नक्षलवाद्यांकडे एके ५६, रॉकेट लॉचर, शक्तीशाली स्फोटके, भूसुरुंग अशी अत्याधुनिक शस्त्रे आहेत. अशा शस्त्रांचा अभाव पोलीस यंत्रणेकडे आहे.

५) नक्षलवादी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध लढण्याची प्रेरणा आहे ती त्यांना लढण्यास नेहमी प्रवृत्त करते. याउलट सुरक्षा रक्षकांकडे त्याची उणीव आहे. इ. अनेक अडथळे आहेत.

नक्षलवाद ही जमीनदारी, सरंजामशाही, सावकारी व्यवस्थेने केलेल्या अन्यायाविरुद्ध झालेल्या संघर्षातून उद्‌भवलेली समस्या आहे. त्यांच्यावरील अन्याय दुर करुन आदिवासी, दलित, शेतकरी, शोषित समाजात शासकीय यंत्रणेबद्दल विश्वास निर्माण करुन ही समस्या सोडविणे शक्य आहे.

## १५.८ सारांश

वरील सर्व विवेचनावरुन असा निष्कर्ष काढता येतो की, दहशतवाद, नक्षलवाद आणि राजकारणातील सत्ता संघर्षातून राजकारणाचे झालेले गुन्हेगारीकरण ही भारतीय राजकीय व्यवस्थेपुढील मोठी आव्हाने आहेत. असे असले तरी निवडणुक पद्धती व कायद्यातील सुधारणा, जनतेचे प्रबोधन, सामाजिक समस्या सोडविण्याला प्राधान्य आणि राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय सहकार्य इ. माध्यमातून या तिन्ही समस्यांवर नियंत्रण करणे शक्य आहे. यात जनता आणि सरकार जनता आणि पोलिस यंत्रणा यातील अंतर कमी होणे महत्त्वाचे आहे.

## १५.९ प्रश्न

१) टिपा द्या.
   अ) दहशतवाद
   ब) गुन्हेगारीकरण
   क) नक्षलवाद
२) दहशतवाद म्हणजे काय ? तो फोफावण्याची कारणमिमांसा करा.
३) राजकारणाचे गुन्हेगारीकरण म्हणजे काय ? ते कसे रोखता येईल ?
४) दहशतवादाची कारणे सांगून दहशतवादावरील उपाययोजनांची चर्चा करा.
५) नक्षलवाद म्हणजे काय ? नक्षलवादी चळवळीची ध्येय धोरणे व कार्यक्रम यांची थोडक्यात माहिती लिहा.
६) नक्षलवादाची कारणे सांगून नक्षलवादी समस्या सोडविण्यातील अडथळे स्पष्ट करा.

❖❖❖❖